उपसा सिंचन योजनांची कामे व इतर प्रकल्पांची बांधकामे
"क" निविदेवर करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन,
जलसंपदा विभाग
शासन निर्णय परिपत्रक क्रं. मसंसं/०५०७/(२७८ /२००७) मोप्र-१ दिनांक ०७/०६/२००७

पहा : १) शा. नि. पाटबंधारे विभाग क्रं.संकीर्ण १०९५/(२५०/९५) क्षेप्र (प्र) दिनांक १६.१२.१९९५
२) शा. नि. पाटबंधारे विभाग क्रं.एमसीएन १०.०१/(५७/२००१) यांत्रिकी दिनांक १६.७.२००२

प्रस्तावना :-

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक मार्फत शासन/महामंडळातर्फे राबविण्यांत येणा-या उपसा सिंचन योजना व इतर प्रकल्पांच्या बांधकामांचे आराखडे/संकल्पने करण्यात येतात. योजनांचे आराखडे हे संबंधीत स्थापत्य, यांत्रिकी व विद्युत संघटनांच्या आवश्यकतेनुसार बैठका आयोजित करुन व त्यामध्ये चर्चा करुनच अंतिम करण्यांत येतात. याबाबत अनुसरावयाच्या कार्यपध्दतीचा उपसा सिंचन योजनांबाबतचा सविस्तर उहापोह दिनांक १६.१२.१९९५ च्या शासन निर्णयामध्ये करण्यात आलेला आहे. तद्वतच उपसा सिंचन योजनेचे संकल्पन व संकल्पचित्रे, आराखडे यासाठी सल्ला देण्यास मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक सक्षम असल्याचे दिनांक १६.७.२००२ चे शासन निर्णयामध्ये स्पष्ट करण्यांत आलेले आहे.

२.० मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत सुरुवातीस योजनेचा सर्वसाधारण आराखडा अंतिम करुन क्षेत्रिय मुख्य अभियंत्यांना शिफारशीसह मंजूरीसाठी पाठविला जातो. त्याआधारे अंदाजपत्रके तयार करुन, निविदा विषयक कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने सर्वसाधारण आराखडा पाठविल्यापासून प्रत्यक्ष बांधकाम सुरु होई पर्यत ब-याचवेळा मोठा कालावधी व्यतित होतो. सर्वसाधारण आराखडयातील तरतुदी, या ढोबळ मानाने (Tentative) केलेल्या असतात व त्यास क्षेत्रिय मुख्य अभियंता यांनी मंजूरी दिल्यानंतरच वेगवेगळया घटकांची सविस्तर संकल्पने हाती घेण्यात येतात. तथापि असे निदर्शनास येते की, ब-याच कालावधीनंतर प्रत्यक्ष संकल्पन करण्याचे वेळी, क्षेत्रिय परिस्थितीमध्ये झालेले बदल संकल्पनाच्या दृष्टीने नव्याने विकसित संकल्पन प्रणालीचा, तसेच संकल्पनास आवश्यक क्षेत्रिय माहिती (Data) (जसे भूस्तराची धरण क्षमता (Bearing Capacity) इ. चा विचार करता सर्वसाधारण आराखडयात दर्शविलेल्या तरतूदीमध्ये बदल संभवतात. कार्यस्थळावर, ब-याचदा खोदाई पूर्ण झाली असल्यामुळे प्रत्यक्ष संकल्पनाच्या वेळी विकसित तंत्रज्ञानाचा व आर्थिक व्यवहार्यतेच्या दृष्टीने विचार करणे शक्य होत नाही. यास्तव निश्चित सूचना निर्गमित करण्याची गरज वाटत आहे.

३.० त्याचप्रमाणे उपरोक्त संपूर्ण प्रक्रियेला बराच कालावधी लागत असल्या निदर्शनास आल्यानंतर, तसेच कामाची व्याप्ती, वेळेची निकड आणि उपलब्ध मनुष्य बळ यांचा विचार क प्रकल्पांची कामे लवकर पूर्ण व्हावीत व जास्तीत जास्त सिंचन क्षेत्राला तातडीने लाभ व्हावा यादृष्टीने ब योजनांचे संकल्पनात्मक सर्वेक्षण , संकल्पन उभारणी इ. सर्व कामे "क" निविदेवर कंत्राटदाराकडून न घेण्याचे धोरण अवलंबविण्यात आले आहे.

अशा प्रकारच्या क निविदेवर प्रस्तावित असलेल्या योजनांमध्ये " योजनांची संरेखा उ संकल्पन, आराखडा व बांधकाम, ठेकेदारांच्या संकल्पनानुसार करण्यास मुभा आहे." या शर्ती र संबंधीत कंत्राटदार संकल्पनाच्या मुळ आराखडयातही मोठया प्रमाणात बदल करतात. सदर बदला योजनांच्या मुळ मंजुरी प्राप्त रचनेच्या व्याप्तीत बदल होऊन आर्थिक पेच प्रसंग उद्‌भवण्याची शक्यता अ

शासन निर्णय :

वरील सर्व बाबींचा विचार करुन उपसा सिंचन योजना व इतर प्रकल्पांची बांध मे याबाबत योजनांचे आराखडे, संकल्पन व प्रत्यक्ष कामात "क" निविदेवर करण्याच्या प्रक्रियेबाबत संबंधितांच्या अनुपालनार्थ शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

१. प्रकल्पांची कामे "क" निविदांवर करावयाची झाल्यास संबंधित यंत्रणेने / अभि ाने विशिष्ट कामाची आवश्यकता व व्यवहार्यता विशद करुन शासनाची/ नियामक मंडळाची मान्यता बंधनकारक राहील.

२. ज्या प्रकल्पांच्या बाबतीत काही वर्षापूर्वी सर्वसाधारण आराखडे मंजुरी प्राप्त होते व काही कारणामुळे ज्या प्रकल्पांचे काम होऊ शकले नाही, अशा प्रकल्पांच्या सर्वसाधारण आर डयास "क" निविदेवर काम प्रस्तावित करण्यापूर्वी, पून:श्च मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेची शिफारस प्रा करुन घेणे क्षेत्रिय अधिका-यांना बंधनकारक आहे.

३. ज्या प्रकल्पांच्या आराखडयांना नव्याने मंजुरी प्राप्त झालेली आहे, अशा प्रकल्प कामे "क" निविदेवर घ्यावयाची झाल्यास, तसा विशेष उल्लेख प्रस्तावांत नमूद करुन त्या सर्वसाधारण आराखड्यांची मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून फेर शिफारस प्राप्त करुन घेणे क्षेत्रिय अधिका-यांना अनि राहील.

४. इत:पर ज्या प्रकल्पांची कामे "क" निविदेवर घ्यायचे प्रस्तावित असेल, ा प्रकल्पांच्या सर्वसाधारण आराखडयांची अंदाजपत्रक त्या निविदाप्रक्रिया सुरु होण्यापूर्वी, सदर प्रकल्प ा सर्वसाधारण आराखडा मध्यवर्ती संकल्पचित्र संघटने कडून मागवित असतांना त्या प्रकल्पाचे काम क" निविदेवर घेण्याचे प्रस्तावित असल्याची बाब सदर प्रस्तावांत नमूद करणे क्षेत्रिय अधिका-यांना अनिवार्य राहील.